# मराठा समाजाचे साखळी उपोषण सुरू

**। कर्जत । वार्ताहर ।**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेले मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी मराठा समाज आता रस्त्यावर उतरला आहे. कर्जत तालुक्यातील मराठा समाज बांधवांनी शनिवार (२८)ऑक्टोबर रोजी टिळक चौकात साखळी उपोषणाला सुरुवात केली असून तीन दिवस हे उपोषण करण्यात येणार आहे.



राज्य सरकारने आरक्षण देण्यासाठी चाळीस दिवसांची मुदत मागितली होती. ही मुदत संपल्याने मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा योद्धा जरांगे -पाटील यांनी आंतरवाली सराटी (जि. जालना) येथे पुन्हा आंदोलन सुरु केले. त्यामुळे संपूर्ण राज्यात पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा मुद्यावर मराठा समाज आक्रमक झाला. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला जगभरातून पाठिंबा देण्यासाठी मराठा समाज रस्त्यावर उतरला आहे. या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने लोकमान्य टिळक चौकात साखळी उपोषणाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष राजेश लाड, माजी सरपंच मधुकर घारे, नगरसेवक सोमनाथ ठोंबरे, हेमंत ठाणगे, माजी नगरसेवक गुरुनाथ पालकर, संतोष पाटील, अनिल भोसले, महेंद्र निगुडकर, ज्ञानेश्वर भालिवडे, संदीप भोईर, प्रकाश पालकर, काशिनाथ शिंदे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, राजेश लाड, संभाजी जगताप, सरपंच प्रमिला बोराडे, पूजा सुर्वे, जगदीश ठाकरे, उमेश म्हसे, मधुकर घारे, स्वप्नील पालकर, सुरेश खानविलकर आदींनी त्यांना पाठिंबा दिला.

## रस्त्यांची कामे पूर्ण करण्याची मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवीन पनवेल सेक्टर ६ मधील दुरावस्थेत असलेल्या रस्त्यांची कामे पूर्ण करण्याची मागणी जयवंत महामुनी यांची आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या नविन पनवेल येथील सेक्टर ६, आदई तलावापसुन टेंभोडे गावाला जाणारा रोड एक्सप्रेस हायवे पर्यंत असणाऱ्या सबवे पर्यंत रस्त्याची कित्येक वर्षांपासून दुरवस्था आहे. शाळेच्या मुलांची स्कुल बस नियमित जाणारा कामगार वर्ग व तेथील राहणाऱ्या नागरिकांना श्वसनाचा त्रास उद्धवत आहे. तरी तो रस्ता लवकरात लवकर बनवून देण्याची मागणी या निवेदनातून महामुनी यांनी केली आहे.

# पनवेल येथील मंथन हॉलचे नूतनीकरण

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ पनवेल कार्यालय येथे मध्यवर्ती मुद्देमाल कक्षाचे भूमिपूजन व मंथन हॉलचे नूतनीकरण नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या प्रमुख उपस्थितीत व पोलीस सह आयुक्त नवी मुंबई चे संजय मोहिते यांच्या हस्ते शुक्रवार(२७) रोजी संपन्न झाले.

यावेळी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त नवी मुंबई चे संजय मोहिते, पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ पनवेलचे पंकज डहाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या सह परिमंडळ-२ पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी



यावेळी उपस्थित होते. मंथन हॉलचे नूतनीकरण करण्यात आल्याने या ठिकाणी खात्या अंतर्गत विविध पोलीस ठाण्याच्या बैठका, पत्रकार परिषद, छोटे खानी कार्यक्रम या ठिकाणी करण्यात येणार असल्याने या दोन्ही उपक्रमाचे नवी मुंबई पोलीस आयुक्त मि लिंद भारंबे यांनी कौतुक केले.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.संतोष गणपत शेकटे, रा.शेलु, ता.कर्जत जि.रायगड यांच्या ताबेकब्जात व वहिवाटीत खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन :- मौजे शेलु, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| १०१/१ | ०.५१.२० | ४.५८ |

सदर मिळकत ही वाडवडीलांपासून आमच्या अशिलांच्या ताबेकब्जात व वहिवाटीत आहे व ते सदर मिळकतीत भाताचे पीक घेत आहेत. असे असताना श्री.नामदेव काशिनाथ शेकटे, श्रीमती लक्ष्मीबाई नथू शेकटे, श्रीमती रोहिणी नामदेव पावशे, श्री.रोहिदास नथु शेकटे व श्री.महेश नथु शेकटे हे इसम सदर मिळकत बेकायदेशीरपणे त्रयस्थ इसमांस विक्री करत आहेत.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात श्री.नामदेव काशिनाथ शेकटे, वैगेरे यांच्या बरोबर कोणत्याही व्यक्तीने गहाण, दान, साठेकरार, करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. सदर मिळकती बाबत सदर व्यक्ती बरोबर कोणीही व्यक्तीने कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास सदर व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक : २९/१०/२०२३

सही/-
**ॲड.उषा.जे.कांबळे**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो नं. ७३८५००४८०६

# पनवेल परिसरात मोबाईल चोरांचा सुळसुळाट

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल परिसरात मोबाईल चोरांचा सुळसुळाट सुरु असून दोन दिवसांमध्ये अज्ञात चोरांनी कामोठे आणि तळोजा परिसरातून ५ मोबाईलची चोरी केली आहे. या अज्ञात चोरांविरोधात तळोजा आणि कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कळंबोलीत राहणारे नागजीराम पांचाळ हे तळोजा एमआयडीसीतील कंपनीत कामास असून रात्रीच्या सुमारास ते मोबाइलवर बोलत कंपनीतून बाहेर पडले होते. यावेळी ते जवळच्या बस स्टॉपवर बस पकडण्यासाठी जात असताना, त्यांच्या पाठीमागून एका मोटारसायकलवरून आलेल्या त्रिकुटांपैकी एकाने पांचाळ यांच्या हातातील १२ हजार रुपये किमतीचा मोबाइल फोन खेचून मोटारसायकलवरून पलायन केले. त्यानंतर दहा मिनिटांतच या त्रिकुटाने तळोजा एमआयडीसीतील राधाकृष्ण हॉटेलसमोरील रस्त्याच्या बाजूला फोनवर बोलत उभा असलेल्या राजेशकुमार सिंग (वय ३० वर्ष) याच्या हातातील १५ हजार रुपये किमतीचा मोबाइल खेचून पलायन केले. या चोरांनी थेट कामोठे गाठून सेक्टर ३६ मधील कॉम्प्लेक्स सत्यकुंज इमारतीसमोरून मोबाइलवर बोलत जाणाऱ्या प्रकाश गुंड (वय २५ वर्ष) या तरुणाच्या हातातील १८ हजार रुपये किमतीचा मोबाइल फोन खेचून पलायन केले. त्यानंतर या चोरांनी दुसऱ्या दिवशी सायंकाळच्या सुमारास तळोजा येथील पडघे गाव येथून कामावर पायी चालत जात असलेल्या शुभम यादव याच्या हातातील १० हजार रुपये किमतीचा मोबाइल फोन खेचून पलायन केले. त्यानंतर रात्रीच्या सुमारास या तिघा चोरांनी तळोजा एमआयडीसीतील टाटा एक्सेम कंपनीसमोर फोनवर बोलत उभ्या असलेल्या अशोककुमार पटवा (वय ३१ वर्ष) याच्या हातातील पाच हजार रुपये किमतीचा मोबाइल खेचून पलायन केले. या चोरांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात चार तर, कामोठे पोलीस ठाण्यात एक असे पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# चालक-वाहकावर कारवाईची मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना एसटी बसमध्ये प्रवेश दिला जात नसल्याबद्दल शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) ग्राहक संरक्षण कक्षाने केला संताप व्यक्त केला असून याबाबत त्यांनी शुक्रवारी पनवेल एसटी आगार कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन अशा बस चालक व वाहकावर कारवाई करण्याची मागणी केली. तालुक्यातील दहिसर, रोहिजंण ते तळोजा दरम्यान शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी एसटी बसमधून प्रवास करीत असतात परंतु अनेक वेळा एसटी बस चालक वाहक या विद्यार्थ्यांना बसमध्ये प्रवेश देत नाहीत. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहेत. या संदर्भात शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) ग्राहक संरक्षण कक्षाचे कक्ष जिल्हा सहसंघटक शशिकांत डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली सुनीत पाटील, सुबोध साळवी व इतर पदाधिकाऱ्यांनी संबंधित पनवेल एसटी आगार कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्याची भेट घेऊन त्यांच्यासमोर विद्यार्थ्यांची बाजू मांडली व त्यांना काही गाड्यांचे नंबर सुद्धा देऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली.

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.सुनिल गोविंद कटारीया, मोबाईल नं. ९७६९३४१७७१, यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक श्री.प्रमोदकुमार हंसराज गांधी व श्री.सुनिल कन्हैयालाल गुंदेचा यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे बार्णे, ता.कर्जत जि.रायगड**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १३ | २ | ०-४८-०० | ६-३१ |
| १३ | ३ | ०-५२-३० | ७-७० |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण,दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २९/१०/२०२३

**ॲड.नरेश रामदास आहीर**
पत्ता-शॉप नं.१२, शिवगंगा,
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत जि.रायगड
मो.९३२५०६००३७

# कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवीन पनवेल येथील कामधेनू फूड्स येथे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याने वाटेत त्याला एक लेडीज पर्स सापडली जी त्याने प्रामाणिकपणे परत दिल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याठिकाणी काम करणाऱ्या राहूल या कर्मचाऱ्याला रस्त्यामध्ये एक पर्स सापडली. त्याने ही बाब हॉटेल मालक सुनील अचोळकर यांना सांगितली. त्यांनतर त्यांच्या मुलीने पर्सची तपासणी केली असता त्या पर्समध्ये आधार, पॅन, वोटरकार्ड, स्टार हेल्थचे कार्ड, रोख रक्कम, विदेशी डॉलर, डेबिट कार्ड वगैरे महत्वाची कागदपत्रे व पत्ता इंदौरचा होता. तसेच त्यामध्ये पनवेल येथील विजय सेल्सचे बिल होते. लगेच विजय सेल्सची संपर्क करीत देवश्री नलावडेंना संपर्क केला. त्या लगेच कामधेनुत आल्या व राहूलला पर्स सापडली होती त्याच्या हस्तेच त्यांना सुपूर्द करण्यात आली.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, १.श्री.इब्राहिम शफी अखाई, राहणार : फ्लॅट नं. ११०१, ११ वा मजला, मरियम अपार्टमेंट, २२/२८, इस्माइल कुर्ते रोड, पायधुनी जवळ, मांडवी, मुंबई ४००००३ व २ श्री.अशरफ अहमद टक्की उर्फ टाकी व ३. सौ.नूरजहॉ अशरफ टक्की उर्फ टाकी (मयत) यांच्या वतीने कायदेशीर वारस श्री.अशरफ अहमद टक्की उर्फ टाकी राहणार : फ्लॅट नं. १८०२, १८ वा मजल,३७५, यास्मीत टॉवर, सोने गुरूजी मार्ग, आगरीपाडा, मुंबई ४०००११, यांच्या खुद्दमालकी हक्कातील, ताबेकब्जातील व वहिवाटीतील शेतजमिन मिळकत असून त्या शेतजमिन मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणेः-

**एकूण मिळकतीचे वर्णन**
**मौजे-निळज, ता.माणगांव, जि.रायगड**

| सर्व्हे/हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|
| ४७३ | ०-३२-६० <br> पो.ख ०-००-७० <br> एकूण ०-३३-३० | ३.६१ |

वरील शेतजमिन मिळकत ही माझे अशिलांना वरील इसमांनी कायमस्वरूपी विक्री करण्याचे ठरविले आहे. तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, या शेतजमिन मिळकतीचा व्यवहार माझ्या अशिलांनी केला असून सदर व्यवहार हा वरील इसमांवर बंधनकारक आहे व सदर कराराची पूर्तता वरील इसमांनी करून देणे त्यांचेवर बंधनकारक आहे. तत्पूर्वी सदर कराराची पूर्तता करणे, तसेच सदर शेतजमिन मिळकत विकण्यापूर्वी ती निर्वेध, बिनकर्जी, बोजारहीत व निजोखकी असणे आवश्यक आहे. जर सदरहू शेतजमिन मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या कायदेशीर कागदपत्रांसह (१५) पंधरा दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी पत्रानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणांकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही तर सदरहू शेतजमिन मिळकतीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी, कळावे.

सही/-
**ॲड.अभिमन्यू जाधव**
पत्ता-अपार्टमेंट क्र. पीएल६ए-४-३
खांदेश्वर अपार्टमेंट, सेक्टर ०१, खांदा कॉलनी,
न्यु पनवेल (प.), ता.पनवेल जि.रायगड
दिनांक : २३/१०/२०२३

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीची सूचना**

मे. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण, न्हावा, ता. उरण, जिल्हा-रायगड यांच्या प्रस्तावित
अ ) ६८० मीटर बर्थ लांबी साठी क्रेन रेल स्पॅन २० मीटर ते ३०. ५० मीटर पर्यंत वाढविणे.
ब ) धक्क्याच्या डेकची रुंदी जमिनीच्या बाजूला १५ मीटरने वाढविणे.
क) विद्यमान ५३० मीटर बर्थ आणि १५० मीटर घाटाचे सुधारणा आणि मजबुतीकरण .

प्रकल्प उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दाखल केला आहे.

भारत सरकार, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्र. एस. ओ. १५३३, दि.१४/०९/२००६ (दिनांक ०१/१२/२००९ सुधारीत) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोक सुनावणीचे आयोजन केले आहे. सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था, विस्थापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सूचना, टिका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी तसेच लेखी स्वरुपात नोंदविता येतील.

लेखी स्वरुपात सुचना ही जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात.

| | |
|---|---|
| **प्रादेशिक कार्यालय,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>रायगड भवन, ७ वा मजला, सेक्टर-११,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४** | **उप-प्रादेशिक कार्यालय, तळोजा,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>रायगड भवन, ७ वा मजला, सेक्टर-११,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.** |

तसेच तोंडी अथवा लेखी स्वरुपातील सूचना खालील ठिकाणी जाहीर लोकसुनावणी वेळेत केल्या जाऊ शकतात.

| अ. क्र. | जन सुनावणीचे ठिकाण | जन सुनावणीची वेळ |
|---|---|---|
| १. | बहुउद्देशीय सभागृह, सेक्टर ०२, जे. एन. पी. टी. कॉलनी , जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण, ता. उरण , जिल्हा रायगड. | १/१२/२०२३ दुपारी १२. ०० वाजता |

सदर प्रकल्पा बाबत माहिती दस्ताऐवज मराठी व इंग्रजी मध्ये खालील ठिकाणी कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध करण्यात आलेले आहेत..

१) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड अलिबाग.
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड अलिबाग.
४) प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय, पनवेल, जि.रायगड.
५) तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता. उरण, जि.रायगड
६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. उरण, जि. रायगड
७) प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ६ वा मजला, रायगड भवन,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
८) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईन्ट, ३ रा मजला, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व),मुंबई-२२.
९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, पश्चिम विभाग, तळ मजला, पूर्व बाजू, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१.
११) मुख्याधिकारी , नगर परिषद उरण, ता. उरण, जिल्हा रायगड.
१२) ग्रामपंचायत कार्यालये : सोनारी , जसखार , डोंगरी , फुंडे , शेवा , हनुमान कोळीवाडा, पांजे,
१३) ग्रुप ग्रामपंचायत घारापुरी, कराल, न्हावा.

**स्वाक्षरीत/-**
**( विक्रांत भालेराव)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तळोजा**

### जाहीर सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, येथिल गट नं. ६९५, एकूण क्षेत्र ०-६७-२० (हे.आर), आकार रू. १५-९१ पैसे, या जमिन मिळकतीपैकी सुमारे ०-११-०० (हे.आर), जमिन मिळकत माझे अशिल श्री. भालचंद्र रामचंद्र नाईक, राहणार चौल मळा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या खुद्द मालकी हक्कांत, प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीत व कसवणूकीखाली असून, सदर मिळकतीशी अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व/वा हितसंबंध कधिही नव्हता व नाही, असे असताना देखिल सदर मिळकतीच्या हक्कनोंदपत्रकी श्री. सुर्यकांत गोविंद म्हात्रे, श्री. राजेंद्र गोविंद म्हात्रे, श्री. पंकज गोविंद म्हात्रे व श्री. रोहन मनोहर म्हात्रे यांची नावे असल्याचा गैरफायदा घेवून सदर लोक माझ्या अशिलांचे हक्क डावलून सदरील मिळकतींची परस्पर त्रयस्थ व्यक्तिस विक्री करण्याच्या विचारात आहेत, असे माझे अशिलास खात्रीशिर समजले आहे. अशा परिस्थितीत माझे अशिलांच्या संमतिशिवाय सदरील मिळकतीचा कसल्याही प्रकारचा व्यवहार कोणीही करू नये. माझे अशिलांच्या संमतिशिवाय सदरील मिळकतींबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो व्यवहार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच, नाईलाजास्तव माझे अशिलांस सदर मिळकतीच्या जमिन मालकांविरूध्द व जमिन खरेदीदारांविरूध्द उचित ती दिवाणी अथवा फौजदारी कार्यवाही करणे भाग पडेल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल, ता. अलिबाग. | ६९५ | ०-६५-१० <br> ०-०२-१० पो.ख. <br> ०-६७-२० एकूण | १५-९१ |
| सदर मिळकतीपैकी ०-११-०० (हे.आर) शेतजमिन मिळकत. | | | |

सदर ०-११-०० आर्स मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे :-
पुर्वेस : गट नं. ६९८ ही वरकस जमिन मिळकत.
पश्चिमेस : गट नं. ६९५ पैकी उर्वरित मिळकत.
दक्षिणेस : गट नं. ६९८ ही जमिन मिळकत.
उत्तरेस : गट नं. ६९५ ही जमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २८/१०/२०२३.

सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत जमिन मालक जगदिश तुलसीदास सोनी यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-रजपे, ता.कर्जत जि.रायगड**

| अ.क्र | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १. | १/५/अ/१ | ०.३८.०० <br> पो.ख.०.०२.०० <br> **एकूण ०.४०.०० हे.आर.पॉ.** | ०.३१ |
| २. | १/६/क | ०.९६.०० <br> पो.ख.०.१४.०० <br> **एकूण १.१०.०० हे.आर.पॉ.** | ०.७० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : २८/१०/२०२३

सही/-
**ॲड.निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं.१५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत-रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे शिलार, ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकती, त्या मिळकतीचे मालक१) चेतना कृष्णा चक्रवर्ती व २) गौतम कृष्णा चक्रवर्ती यांचेकडून विकत घेणेचे ठरविल्या आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १ | १ | ०-६८-०० | ०-२५ |
| १ | १६ | ०-८४-०० | ०-१७ |

सबब सदर मिळकतीच व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९/१०/२०२३

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता.कर्जत,
जि.रायगड-४१०२०१.

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यास येते की, तलाठी सजा खारढोंबी हद्दीतील मौजे खारढोंबी, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल १. श्री. अनिल अर्जुन कोठेकर २. श्री.अभिमन्यु अर्जुन कोठेकर यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक १. श्री. यशवंत बाळराम पाटील २. तारा एकनाथ तांडेल ३. श्री. संतोष नामदेव म्हात्रे ४. श्री. रमेश नामदेव म्हात्रे यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| खारढोंबी | ५/२ब | ०.२०.२० | ३.०० |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण :- पेण
दि.२८/१०/२०२३

सही/-
**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२, प्रभु आळी, पेण

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे रेवदंडा, ता.अलिबाग जि.रायगड येथील, खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक श्री हेमंत मुकूंद दांडेकर व सौ.अनिता हेमंत दांडेकर, दोघे रा.थेरोंडा दांडेकरवाडी, पो. चौल, ता.अलिबाग जि.रायगड यांच्या नावे असलेली बागायत मिळकत माझे स्नेही श्री.सागर अशोक शिंदे, रा.५०३, बिल्डींग नं.१५, शांती गार्डन, सेक्टर ६, रॉयल कॉलेजच्या बाजुला, मीरा रोड, ठाणे यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. विद्यमान मालकांबरोबर साठेकरारा झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| रेवदंडा | १५७/१/१/ब/४ | ०.३१.१० <br> पो.ख.०.०१.०० <br> एकूण ०.३२.१० | १९.४४ |

वर नमूद बागायत मिळकतीपैकी श्री हेमंत मुकूंद दांडेकर व सौ.अनिता हेमंत दांडेकर यांचे मालकीहक्कात असलेल्या ०.०६.१४ हे.आर. पो.ख.०.०१.०० हे.आर., एकूण ०.०७.१४ हे.आर., आकार रू.३.१४ पैसे या बागायत मिळकतीबाबत.

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा वा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांची या नोटीशीच्या तारखेपासून ७ दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यांसह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष व रजिस्टर पोष्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दि.२७/१०/२०२३

सही/-
**श्री.जयवंत दत्तात्रेय म्हात्रे**
रा.थेरोंडा (धाकलीवाडी) पो.चौल,
ता.अलिबाग जि.रायगड

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५